महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत
ओम सुपर मार्केट जवळ, बहिरट पाटील चौक,
शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.तंशिविकापु/विवि.५/तृतीयपंथी/२०२३/ 2899
दिनांक : - 6 JUL 2023

**परिपत्रकः**

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या
व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या सर्व शासकीय/
अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित संस्था
(पुणे विभाग पुणे)

**विषय :- राज्यातील तृतीयपंथीय या घटकातील वर्गास शिक्षण, नोकरी व शासकीय योजनांमध्ये लिंग पर्यायामध्ये "स्त्री" "पुरुष" यासोबत "तृतीयपंथी" हा पर्याय ठेवण्याबाबत...**

संदर्भ :- १).तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक : ४/आस्था/२०२३/४३१, दि. २८.०६.२०२३उ
२).महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र : तृतीय-२०२२/ प्र.क्र.३७९/सामासु, दि.०३.०३.२०२३

उपरोक्त विषयाच्या संदर्भ क्र. १ च्या पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यांत येते की, वरील संदर्भ क्र. २ च्या शासन पत्रासोबत राज्यातील तृतीयपंथीय या समाज घटकांची सर्वांगीण उन्नती व्हावी व त्यांना समाजाच्या विकास प्रवाहात आणण्यासाठी तसेच तृतीयपंथीयांना भेदभाव विरहीत वागणूक देण्यासाठी सर्व शासकीय विभाग आणि सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या आस्थापनेवरील सर्व पदांच्या भरती प्रक्रियेमध्ये अर्ज / आवेदनपत्रावर लिंग पर्याय म्हणून "पुरुष" व "स्त्री" घटकांबरोबर "तृतीयपंथी" हा पर्याय उपलब्ध करुन देण्यात यावा. {(पुरुष/स्त्री/तृतीयपंथी) (Male/Female/Transgender)} असा शासन निर्णय प्राप्त झालेला आहे (सोबत प्रत जोडली आहे)

तरी या परिपत्रकाव्दारे आपणास सूचित करण्यात येते की, सोबत जोडलेल्या शासन निर्णयाचे अवलोकन करावे व.त्यातील तरतूदीनुसार कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे भरती प्रक्रिया व अन्य प्रशासकीय बाबींसाठी आपल्या संस्था स्तरावर होणा-या कार्यवाहीच्या वेळी देखील या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन होईल याबाबत दक्षता घ्यावी.

सोबत : संदर्भ क्र. १ व २ च्या प्रती.

आपला

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : या कार्यालयातील प्रोगामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,
ई-मेल-desk4@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक: ४/आस्था/२०२३/ ४३७ दिनांक: 28 JUN 2023

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नाशिक, नागपूर

विषय : राज्यातील तृतीयपंथीय या घटकातील वर्गास शिक्षण, नोकरी व शासकीय योजनांमध्ये लिंग पर्यायामध्ये "स्त्री", "पुरुष" यासोबत "तृतीयपंथी" हा पर्याय ठेवण्याबाबत.

संदर्भ : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे पत्र क्र.तृतीय-२०२२/प्र.क्र.३७९/सामासु, दि.०३.०३.२०२३

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भाधिन शासन पत्रासोबत राज्यातील तृतीयपंथीय या समाज घटकांची सर्वांगीण उन्नती व्हावी व त्यांना समाजाच्या विकास प्रवाहात आणण्यासाठी तसेच तृतीयपंथीयांना भेदभावरहित वागणूक देण्यासाठी सर्व शासकीय विभाग आणि सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या आस्थापनेवरील सर्व पदांच्या भरती प्रक्रीयेमध्ये अर्ज / आवेदनपत्रावर लिंग पर्याय म्हणून "पुरुष" व "स्त्री" घटकाबरोबर "तृतीयपंथी" हा पर्याय उपलब्ध करुन देण्यात यावा. {(पुरुष/स्त्री/तृतीयपंथी) (Male/Female/Transgender)}असा शासननिर्णय प्राप्त झालेला आहे.

सदर शासननिर्णयांतील तरतूदींप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील संस्थांना अवगत करावे. त्याप्रमाणे भरती प्रक्रियेचा व अन्य प्रशासकीय बाबीसाठी आपल्या स्थरावर होणा-या कार्यवाहीच्या वेळी देखील या शासननिर्णयातील तरतूदींचे पालन होईल याबाबत दक्षता घ्यावी.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
03 JUL 2023
आवक क्र. ५९६०

आपला

(महेंद्र दवणे)
उपसंचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

राज्यातील तृतीयपंथीय या घटकातील वर्गास शिक्षण, नोकरी व शासकीय योजनांमध्ये लिंग पर्यायामध्ये "स्त्री", "पुरुष" यासोबत "तृतीयपंथी" हा पर्याय ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
**शासन निर्णय क्र. तृतीय-२०२२/प्र.क्र.३७९/सामासु**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय (विस्तार), मुंबई
दिनांक : ०३ मार्च, २०२३

<u>वाचा</u> : १. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.तृतीय-२०१८/ प्र.क्र.२६/सामासु, दि.१३.१२.२०१८
२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.तृतीय-२०१८/ प्र.क्र.२६/सामासु, दि.८.६.२०२०
३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.तृतीय-२०१८/ प्र.क्र.२६/सामासु, दि.७.१०.२०२०

<u>प्रस्तावना :</u>

केंद्र शासनाने तृतीयपंथीय व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम २०१९ पारित केला आहे. सदर अधिनियमामधील प्रकरण ५ -कलम ९ व १० मध्ये अशी तरतूद केली आहे की, कोणतीही आस्थापना कोणत्याही तृतीयपंथी व्यक्तीशी, रोजगाराशी संबंधित कोणत्याही बाबतीत भेदभाव करणार नाही. प्रत्येक आस्थापना या कायद्याच्या तरतूदीचे पालन करील.

तसेच राज्य शासनाच्या महिला धोरण, २०१४ मध्येही समाजाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर फेकले गेलेले तृतीयपंथी यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न करण्याची बाब नमूद आहे. त्यानुसार तृतीयपंथींची लिंगनिहाय ओळख करुन तृतीयपंथीयांचा विकास घडवून आणणे आवश्यक आहे.

२. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (रिट पिटिशन क्र.४००/२०१२, व ६०४/२०१३) या प्रकरणामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने केंद्र आणि राज्य सरकारांना निर्देश दिले आहेत की, तृतीयपंथीयांना सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय नागरिक समजण्याराठी पावले उचलावीत आणि शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाच्या बाबतीत आणि सार्वजनिक नियुक्त्यांसाठी सर्व प्रकारचे आरक्षण देण्यात यावे.

सद्यस्थितीत, तृतीयपंथीयांना नोकरी व शिक्षणामध्ये आरक्षण देण्यात यावे, या मागणीसाठी संपदा ग्रामीण महिला संस्था (संग्राम) व इतर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका (एल) क्र. २७८१/२०२२ दाखल केली आहे.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे एका तृतीयपंथीय (अर्जदार) च्या अर्जावर सुनावणीच्या दरम्यान तिला ट्रान्सजेंडर उमेदवार म्हणून पोलीस उपनिरीक्षक पदासाठी अर्ज करण्याची परवानगी तसेच तृतीयपंथीयांना सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय नागरिक मानण्यासाठी पावले उचलण्याचे आणि त्यांना शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाच्या बाबतीत आणि सार्वजनिक नियुक्त्यांसाठी आरक्षण व पदांच्या तरतुदीबाबत राज्य शासन स्पष्ट धोरण आखेल,अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

तसेच पोलीस भरती प्रक्रियेसंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. १५०३३/ २०२२ (आर्या पुजारी) व रिट याचिका क्र.१५०३७/२०२२ (निकिता मुखयादल) या न्यायालयीन प्रकरणी

मा.न्यायालयाने दि. ९ डिसेंबर, २०२२ रोजी निदेश दिले की, पोलीस भरती प्रक्रियेसाठी तृतीयपंथीयांनाही अर्ज करता यावा याद्दष्टीने गृह विभागाने दि. १३ डिसेंबर २०२२ पर्यंत वेबसाईटवर तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र पर्याय ठेवणे, तृतीयपंथीय उमेदवाराच्या बाबतीत शारीरिक चाचणी इत्यादीबाबत नियम अंतिम करुन ते अधिसूचित करण्याची कार्यवाही दि. २८ फेब्रुवारी २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश सरकारला दिले आहेत.

याप्रमाणे तृतीयपंथीयांना राज्यातील विविध प्रशासकीय विभागांतर्गत नोकरी व शिक्षणामध्ये आरक्षण मिळण्याबाबत विविध न्यायालयात याचिका दाखल होत आहेत.

३. NALSA, २०१४ च्या निकालात, मा.सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले होते की, पुरुष व स्त्री व्यतिरिक्त तृतीयपंथी समुदयाच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी तिसरे लिंग हा पर्याय मानला पाहिजे.

सबब उपरोक्तप्रमाणे विविध न्यायालयांचे निर्देश व कायद्यातील तरतुदी लक्षात घेता, राज्यातील तृतीयपंथीय घटकाला राज्य शासनाच्या अखत्यारितील शैक्षणिक, नोकरी व शासकीय योजनांमध्ये जिथे जिथे लिंगाबाबत विचारणा करण्यात येईल तिथे तिथे लिंग पर्याय म्हणून "पुरुष" व "स्त्री" या पर्यायाबरोबर "तृतीयपंथी" हा पर्याय उपलब्ध करुन देणे ही बाब अनिवार्य करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

## शासन निर्णय:

राज्यातील तृतीयपंथीय या समाज घटकांची सर्वांगीण उन्नती व्हावी व त्यांना समाजाच्या विकास प्रवाहात आणण्यासाठी तसेच तृतीयपंथीयांना भेदभावरहित वागणूक देण्यासाठी सर्व शासकीय विभाग आणि सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या आस्थापनेवरील सर्व पदांच्या भरती प्रक्रीयेमध्ये अर्ज/आवेदनपत्रावर लिंग पर्याय म्हणून "पुरुष" व "स्त्री" घटकाबरोबर "तृतीयपंथी" हा पर्याय उपलब्ध करुन देण्यात यावा. जसे {(पुरुष/स्त्री/तृतीयपंथी) (Male/Female/Transgender)}

तसेच उपरोक्तप्रमाणे तृतीयपंथीय घटकाला नोकरी, शिक्षण क्षेत्रासह सर्व शासकीय योजनांमध्ये जिथे जिथे लिंगाबाबत विचारणा करण्यात येईल तिथे तिथे "पुरुष"/"स्त्री" या पर्यायासोबत "तृतीयपंथी" हा लिंग पर्याय उपलब्ध करण्यात यावा. मात्र त्या बाबीसाठी संबंधित सक्षम प्राधिका-याने आवश्यक अर्हता विहित करावी किंवा असलेल्या अर्हतेची पूर्तता तृतीयपंथीयांना करावी लागेल.

२. उपरोक्त शासन निर्णय शासकीय/निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे, नगरपालिका/महानगरपालिका, जिल्हा परिषदा, शासकीय विद्यालये, महाविद्यालये, शासकीय शैक्षणिक संस्था, खाजगी विद्यालये, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, अनुदानित/विना अनुदानित विद्यालये, महाविद्यालये व शैक्षणिक संस्था आणि ज्यांना आदेश देण्याचा अधिकार शासनाला आहे, अशी इतर सर्व प्राधिकरणे, सेवा व संस्था यांना लागू राहील.

३. मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, याबाबतीत त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख/आस्थापना अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

४. सदर शासन निर्णयाची तात्काळ व काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२३०३०३१७०३२७५७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJESH SADASHIV MANJREKAR

Digitally signed by RAJESH SADASHIV MANJREKAR DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT, cn=RAJESH SADASHIV MANJREKAR Date: 2023.03.06 18:29:07 +05'30'

( राजेश मांजरेकर )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
७. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई
९. मा. मंत्री/राज्यमंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई
१२. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
१३. मा.प्रधान सचिव, विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानमंडळ, मुंबई
१४. मा. महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर
१५. मा. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर
१६. सर्व विभागीय आयुक्त (महसूल)
१७. आयुक्त, समाजकल्याण, पुणे
१८. जिल्हाधिकारी (सर्व)
१९. प्रबंधक, उच्च न्यायालय,मुळ शाखा, मुंबई
२०. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा,मुंबई
२१. प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकआयुक्त यांचे कार्यालय,मुंबई
२२. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद
२३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
२४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई
२५. राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
२६. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त

२७. सर्व प्रादेशिक उपायुक्त (समाजकल्याण विभाग)
२८. सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण
२९. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
३०. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
३१. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ
३२. निवड नस्ती, सामासु.

--------------